वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ पाने ४ किंमत ३

# जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात

## शिंदे हे अमित शाहांचे गुलाम, बाळासाहेबांची शिकवण धुळीस मिळवली-काँग्रेस



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमानाचा प्रदेश आहे. स्वराज्यासाठी शिवरायांनी सुरतेवर स्वारी केली होती. छत्रपती शिवरायांच्या राज्यात एकनाथ शिंदेंसारख्या गुलामांनी महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला आहे. सत्तेसाठी लाचार झालेला माणूसच महाराष्ट्रातील कार्यक्रमात जय गुजरातची घोषणा देऊ शकतो. पण स्वाभिमानी मराठी माणूस हे कदापी सहन करणार नाही, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.



बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडून पक्ष व चिन्ह गुजरातच्या मालकाने शिंदेंना दिले व मुख्यमंत्रीपदी बसवले त्या शिंदेच्या तोंडून मोदी-शाह स्तुती करणे समजू शकतो. पण आपल्या गुजराती मालकाला खूष करण्यासाठी चक्क जय गुजरात म्हणावे एवढी लाचारी बरी नव्हे. अमित शाह यांचा 'वफादार' शिलेदार होण्याच्या नादात एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राची मान शरमेने खाली घातली. महाराष्ट्राच्या सत्तेत एकापेक्षा एक नमुने बसलेत हे पुन्हा एकदा दिसले. एकनाथ शिंदे गुजरातचे नाही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत याचा त्यांना विसर पडला का? असा सवाल करत महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

मुंबई व महाराष्ट्र विकून गुजरातची तिजोरी भरण्याचे काम शिंदे करत आहेत. मागील ११ वर्षात महाराष्ट्रातील उद्योग, संस्था, कार्पोरेट ऑफिसेस आणि कोट्यवधी निधी हा फडणवीस आणि शिंदेंमुळेच गुजरामध्ये जात

▸▸ पान २ वर

## नितेश राणे म्हणाले, मनसेवाल्यांनी भेंडीबाजारात जाऊन टोपीवाल्यांना मारुन दाखवावं

# काठ्या चालवणाऱ्यांनी आम्हाला तलवार चालवायला शिकवू नये-संदीप देशपांडे



मुंबई, (दिव्य न्युज):- मनसेची हिंमत असेल तर त्यांनी भेंडीबाजार, नळबाजार किंवा मोहम्मद अली रोडला जाऊन लोकांना मारुन दाखवावं, असे वक्तव्य करणारे भाजप आमदार नितेश राणे यांना मनसेचे मुंबई विभागप्रमुख संदीप देशपांडे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्या लोकांना मराठीतील 'श'चा उच्चार करता येत नाही, ते भाजपमधील नेते मीरा-भाईंदरमध्ये मोर्चा काढण्यासाठी फूस

▸▸ पान २ वर

# कोयता, लोखंडी रॉड अन् दगडानं ४ जणांना मारहाण

बीड , (दिव्य न्युज):- बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र आहे. अशातच बीडमध्ये आणखी एक धक्कादायक बातमी उघडकीस आली आहे. जुन्या वादातून तलवार, कोयता, लोखंडी रॉड आणि दगडाने चार जणांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ही घटना काल सायंकाळच्या सुमारास घडली असून, पोलिसांनी कारवाई करत ७



आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

बीडच्या केज तालुक्यातील डोका गावात हाणामारीचा प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसारस दोन गटात वाद उफाळून आला. विक्रम भांगे, सागर भांगे आणि त्यांच्यासोबत आणखी पाच जणांनी मिळून तुम्ही आमच्यावर गुन्हा का दाखल केला? या कारणावरून तक्रारदार पक्षावर हल्ला चढवला. त्यांनी धारदार शस्त्रं आणि दगड वापरत जोरदार मारहाण केली.आरोपींनी केलेल्या हल्ल्यात चार जण गंभीर जखमी

▸▸ पान २ वर

# राज्यातील शाळांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती आता कंत्राटी पद्धतीने




मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यातील शाळांमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती आता कंत्राटी पद्धतीने केली जाणार असल्याची अधिकृत घोषणा आज विधानपरिषदेत करण्यात आली. या निर्णयामुळे शाळांमध्ये शिपाई आणि इतर सहाय्यक पदांसाठी पारंपरिक कायमस्वरूपी भरतीऐवजी कंत्राटी पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. याची घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली आहे.

राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे फक्त शिपाई नाही तर सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतील. या निर्णयापासून जे कर्मचारी आता आहेत ते निवृत्त होईपर्यंत राहतील पण त्यांची जागा रिक्त झाल्यावर त्यापुढे त्यांच्या जागेवर कंत्राटी कर्मचारी भरती केले जाणार अशी माहिती शिक्षण मंत्री दादा भूसे यांची विधान परिषदेत दिली. ,पुढे एका प्रश्नाचे उत्तर देताना शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि

▸▸ पान २ वर

## संग्राम दोन दिवसात मारणार

# अजित पवारांच्या आमदाराला जीवे मारण्याची धमकी



अहमदनगर , (दिव्य न्युज):-अहिल्यानगरमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार संग्राम जगताप यांना बुधवारी रात्री जीवे मारण्याची धमकी मिळाली. खासगी स्वीय सहाय्यक यांच्या मोबाइलवर धमकीचा मेसेज आल्यानंतर एकच खळबळ उडाली. याप्रकरणी जगताप यांच्याकडून तात्काळ पोलिसांत धाव घेण्यात

▸▸ पान २ वर

# थाळी एकच पण जेवले ५० जण

## शिवभोजन थाळीत 'डिजीटल भ्रष्टाचार'

बीड , (दिव्य न्युज):- शासकीय योजना ह्या भ्रष्टाचार करणाऱ्यांसाठी एक कुरणच बनल्या आहेत. अशा योजनांमध्ये भ्रष्टाचार हा मुद्दा काही नवा नाही. अनेकदा खोटी कामे दाखवणं, खोटे लाभार्थी दाखवणं किंवा योजनांचे पैसे बोगस खात्यांमध्ये वळवणे अशा वेगवेगळ्या पद्धती वापरून भ्रष्टाचार करण्यात येतो. आता बीडमध्ये एक धक्कादायक अशी घटना समोर आली आहे. उडपी हॉटेलमध्ये



शिवभोजन थाळीचं अनुदान लाटण्यासाठी एकाच थाळीसमोर ५० जणांना बसवून फोटो काढले जात असल्याचा

पान २ वर

# अनधिकृत शाळा तपासणी; बीईओंना वेळच मिळेना

## सहसंचालकांच्या आदेशाकडे दुर्लक्ष : पुन्हा एकदा तपासणीचा आदेश

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या शाळांची माहिती घेऊन पाहणी करून कारवाईसाठी निर्देश देऊनही गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून अहवाल आलेला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा अनधिकृत शाळा तपासणी करण्याचे निर्देश माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी दिले आहेत.

राज्यातील अनधिकृत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांबाबतची माहिती कळविण्याबाबत शिक्षण सहसंचालकांनी निर्देशित केले होते. त्यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी तालुक्यातील अनधिकृत शाळा आढळल्यास संबंधित शाळेवर शासनाच्या १८ डिसेंबर २०२३ नुसार कारवाईच्या सूचना दिल्या होत्या; परंतु जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून त्यांच्या तालुक्यातील माहिती अद्याप पाठविण्यात आलेली नाही. विविध शैक्षणिक कामांमुळे वेळ मिळाला नाही की, शासनाच्या निर्देशाकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे पडताळण्याची गरज आहे. माहिती सादर न केल्याने तालुक्यातील अनधिकृत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची माहिती पाठविण्याचे निर्देश शिक्षणाधिकारी

▸▸ पान २ वर

### पाहणी करा, जिओ टॅग फोटो काढा

गटशिक्षण कार्यालयाच्या अधिनस्थ शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुखांकडून त्यांच्या बीट, केंद्रातील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जिओ टॅग फोटो काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### ही माहिती मागविली

अनधिकृत शाळेचे नाव, इरादापत्र मिळालेल्या; परंतु अद्यापही मान्यता पत्र न मिळालेल्या शाळांची संख्या, अनधिकृत स्थलांतर केलेल्या शाळांची संख्या, अन्य अनधिकृत शाळांची संख्या, बंद झालेल्या शाळांची संख्या, अद्यापही बंद न झालेल्या शाळांची संख्या, अनधिकृत शाळा बंद करण्यासाठी केलेल्या उपाययोजना आदी माहितीचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांनी मागविला आहे.







# बीड अर्बन मल्टिस्टेटमध्ये बनावट स्वाक्षऱ्या करून ५० लाखांचा अपहार

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील बीड अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीमध्ये एक धक्कादायक आर्थिक घोटाला समोर आला आहे. दिलीप रामगोपाल चितलांगे यांनी त्यांच्या दिवंगत वडिलांच्या एचयूएफ (हिंदू अविभाज्य कुटुंब) खात्यातून तब्बल ५० लाख रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप केला आहे. वडिलांच्या निधनानंतर बनावट स्वाक्षऱ्या आणि नियमांना बगल देऊन ही फसवणूक केल्याचा त्यांचा दावा आहे. याप्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप चितलांगे यांचे वडील डॉ. रामगोपाल वं. चितलांग यांचे ०९ मे २०२४ रोजी निधन झाले. त्यांचे बीह अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी, सहयोगनगर येथे 'रामगोपाल चितलांगे एचयूएफ' या नावाने बचत खाते आणि १६ लाख ९६ हजार, २५ लाख आणि १२ लाख ५० हजार अशा मोठ्या मुदत ठेवी होत्या. वडिलांच्या मृत्यूनंतर नियमानुसार एचयूएफ खात्याचा कर्ता ज्येष्ठ मुलगा होतो. मात्र, पतसंस्थेने आरबीआय आणि आयकर विभागाचे नियम धाब्यावर बसवून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केली नाही. उलट, बनावट स्वाक्षऱ्या वापरून ठेवींचा अपहार केला, असा दिलीप चितलांगे यांचा गंभीर आरोप आहे.

पतसंस्थेच्या नोंदींमध्येही एचयूएफ खात्याचा उल्लेख जानेवारी २०२५ पासून 'ईओएस' किंवा संयुक्त खाते असा वेगवेगळ्या प्रकारे दिसू लागल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे. ०९ मे २०२४ (वडिलांचे निधन झाले त्या दिवसापासून ते आजपर्यंत पतसंस्थेच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकांनी संगनमत करून बनाव कागदपत्रे तयार केली आणि अंदाजे लाख रुपयांची फसवणूक केट असल्याचा चितलांगे यांचा दावा आहे. गंभीर प्रकरणी

▸▸ पान २ वर

# टॅक्स वाचविण्यासाठी खाटोकर वेगवेगळ्या क्लासेसचा मालक

# विजय पवारच्या पापाचाघडा भरला नाही

## क्लासेसच्या शिक्षकांची हजेरी, सुट्ट्यांच्या नोंदी, विद्यार्थ्यांची हजेरी रेकॉर्ड नाही

## जुना डेटा रिकव्हर करण्यासाठी डीव्हीआर फॉरेन्सिक लॅबला पाठवले

## पोलिसांनी आतापर्यंत ३० जणांचे जबाब नोंदवले

## खाटोकरची दुचाकी जप्त, दोघांचे मोबाईल, टॅब जप्त

## ४० सीसीटीव्हीमध्ये केवळ २० दिवसांचा डेटा

## सर्वात महत्वाचे पोलीस घटनेचे रिक्रिएशन करणार



बीड (दिव्य न्युज):- अवघा महाराष्ट्र हादरवून सोडणारी आणि पालकांची चिंता वाढवणार्या बीडमधील उमाकिरण शिक्षण संकुलच्या लंपट शिक्षक विजय पवार त्याचा साथीदार संतोष खाटोकर यांच्या पापाचा घडा भरला नाही तर तो ओसंडून वाहत असल्याचे आता तपासात समोर येत आहे. मुलींसोबत अश्लिल चाळे करणार्या विजय पवारने शासनाची फसवणुक करण्यासाठी आणि टॅक्स वाचवण्यासाठी खाटोकरलाच वेगवेगळ्या क्लासेसचा मालक केल्याचे समोर आले असून शिक्षकांच्या हजेर्या, सुट्ट्यांच्या नोंदी आणि विद्यार्थ्यांबाबत कुठलेही हजेरी रजिस्टर रेकॉर्ड ठेवले नसल्याचे आता समोर आले आहे. पोलिसांनी या दोघांबाबत आणखी फास आवळला असून आतापर्यंत ३० जणांचे जबाब नोंदवण्यात आले आहे. खाटोकरची दुचाकी, आणि दोघांचेही मोबाईल, टॅब, लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही ताब्यात घेतले असून त्यामध्ये केवळ २० दिवसांचा डाटा उपलब्ध असल्याने डीव्हीआर फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात आले आहे. पोलिसांनी विजय पवार व खाटोकरला सोबत घेऊन घटनेचे रिक्रिएशन करणार असल्याचेही सांगितले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, उमाकिरण शिक्षण संकुलसह अन्य संस्थांचा कर्ताधर्ता असलेला विजय पवार याने पैसा आणि राजकीय बळावर आतापर्यंत शिक्षणाचा बाजार बसवत आपले गोरख धंदे सुरू ठेवले. मात्र जेव्हा गुन्ह्याची शंभरी होते तेव्हा पापाचा घडा भरतो. एका अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषणाबाबतची तक्रार आल्यानंतर विजय पवारचा खरा चेहरा समाजासमोर आला आणि त्याच्या विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला. या घटनेने उभ्या महाराष्ट्राला हादरवून सोडले आहे. विधानसभेतही याचे पडसाद उमटले. तसे पोलिसांनी विजय पवार आणि त्याच्या साथीदारावर फास आवळायला सुरुवात केली. पोलिसांनी आतापर्यंत ३० जणांचे जबाब नोंदवले आहेत. पिडितेच्या मैत्रीनी, कुटुंबीय, क्लासमधील काही जणांचा यामध्ये समावेश आहे. दुसरीकडे विजय पवार व त्याचा साथीदार प्रशांत खाटोकर यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत पोलिस तपासत आहेत. त्यामध्ये पवार याने कर वाचवण्यासाठी खाटोकरला वेगवेगळ्या क्लासेसचा मालक दाखवलं आहे. शिक्षकांचे हजेरी पुस्तक, सुट्टयांची नोंदी, विद्यार्थ्यांची हजेरी याबाबतचे कुठलेही नोंदी ठेवल्याचे दिसून आले नाही.

या प्रकरणात पोलिसांनी दोघांचे मोबाईल, लॅपटॉप, टॅब जप्त केले आहे. क्लासेसमधील ४० सीसीटीव्ही कॅमेरे व त्याचे डीव्हीआर जप्त करण्यात आले असून त्यात केवळ २० दिवसांचा डेटा असल्याचे सांगण्यात येते. घटना वर्षभराची असल्याने जुना डाटा रिकव्हर करण्यासाठी डीव्हीआर फॉरेन्सिक लॅबला पाठवला जाणार आहे. या प्रकरणात पिडितेने घटनास्थळ दाखवले, त्याचा पंचनामा करण्यात आला, त्याचबरोबर पिडितेने थेट न्यायालयातही जबाब दिला आहे. त्यामुळे आता पोलीस दोन्ही आरोपी शिक्षकांना सोबत घेऊन घटनेचे रिक्रिएशन करण्याची तयारी करत आहेत. नेमकी घटना कशी घडली, त्यात कशाप्रकारे आरोपींना कायदा मोडला. कोणत्या बाबी सीसीटीव्हीत नोंद झाल्या, बाकीच्या का झाल्या नाही यासह अन्य बाबींसाठी हे रिक्रिएशन केले जाणार आहे.

---

पान ४ वरून

## पैठण येथे तहसील

बँक खात्यात जमा करण्यात यावी.

शेतक-यांवर अन्याय वाढत चालला आहे. सचिन घायाळ संचलित संत एकनाथ सहकारी साखर कारखाना व शिवाजी अग्रो नांदर या हुकुमशाही साखर कारखानदारीला वेळीच लगाम घालण्याची गरज आहे.पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदान ही मिळाले नाही. ते तात्काळ शेतकऱ्यांना वाटप करण्यात यावे.

लाईटचा प्रश्न ही चिंतेचा आहे शहरात ही लाईन येती, जाते, ग्रामीण भागात देखील अशीच स्थिती असल्यामुळे शेती पंपाच्या लाईट योग्य रीतीने नसल्यामुळे पैठण तालुक्यातील शेतकरी बांधवांची परिस्थिती बाप भीक मागू देईना आणि आई जेऊ देईना, अशीच झाली आहे. असे अनेक प्रश्न आहेत या सर्व प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. पैठण तालुक्यातील बोगस खत बियाणाची सर्रास बिक्री चालु आहे ती तात्काळ थांबवुन शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे खते देण्यात यावा. पैठण पूर्णवेळ अधिकारी नसल्यामुळे लोकांच्या कामाकडे दुर्लक्ष मोठ्या प्रमाणात होत आहे. पैठण तालुक्यास पूर्ण वेळ तहसीलदार व गटविकास अधिकारी मिळावेत तरी वरील सर्व प्रश्न दि.७. जुलै पर्यंत मार्गी लावण्यात यावेत नसता स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे माउली मुळे , जगन्नाथ होरकटे, राजेंद्र खंडागळे , लक्ष्मण औटे, संतोष पवार , अनिल राठोड , संजय घनवट , दगडू वीर , लतीफ पठाण , बद्रीनाथ नजन , विठ्ठल मिसाळ , वैजनाथ मापारी असे इतर शेतकऱ्यांच्या वतीने दि८ जुलै रोजी सकाळी ११.३० वा. तीव्र आंदोलन तहसिल कार्यालय पैठण समोर न्याय मिळाला नाही तर त्याच क्षणी आमरण उपोषण चालु करण्यात येईल आंदोलना मध्ये काही विपरित परिणाम झाल्यास त्यास साखर प्रशासन व कारखानदार हे जबाबदार राहतील. हुकूमशाही पद्धतीने. प्रशासन सत्ताधारी कायदा हातात घेत असतील तर सर्वसामान्यांनी काय करायचे याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे हा जाब विचारण्यासाठी सर्वांनी एकत्रित येणे ही आता काळाची गरज झाली आहे.असे सुज्ञ नागरिकांचे म्हणणे आहे.

## बनावट बांधकाम

कामगार अधिकारी, आरोग्य विभाग, ग्रामसेवक, दलाल व बनावट लाभार्थी यांनी सर्रासपणे बनावट दस्तावेज मान्य करून हितसंबंधातील लोकांना या योजनेचा लाभ दिला आहे. प्रत्येक लाभार्थीकडून एक हजार रुपये याप्रमाणे आर्थिक वसुली करून जिल्ह्यात सुमारे ८४ हजार लोकांना बांधकाम कामगार दाखवून त्यांना ही मदत वाटप केली आहे. अजून ६० हजार बनावट लाभार्थ्यांचे कागदपत्रे तयार करण्यासाठी हे दलाल कामासाठी लागलेले आहेत. ९० दिवस बांधकामावर काम केल्याचे कंत्राटदाराकडून प्रमाणपत्रे घेण्यात आली आहेत. कंत्राटदार कुठेही नोंदणीकृत नाहीत, तसेच त्यांना कोणत्याही शासकीय कामाच्या ऑर्डर मिळालेल्या नाहीत, त्यांनी कोणती काम केली त्यांच्याकडे किती दिवस काम उपलब्ध होते, याबाबत कामगार विभागाकडे कोणतीही अध्यायवत माहिती नाही. बनावट लेबर कार्ड तयार करून या योजनेचा लाभ दलालांनी मिळवून दिलेला आहे. भांडी साहित्य, आरोग्य सुविधा, शिक्षण शिष्यवृत्ती व इतर विविध योजनांचा लाभ घ्यायचा असेल तर सर्रासपणे लाभार्थ्यांकडून पैसे वसूल करण्यात आलेले आहेत. नोंदणीसाठी केवळ एक रुपये शासन शुल्क असताना ते १ हजार रूपये शुल्क सांगून गोरगरीब आणि गरजू जनतेची लूट केली आहे. या सर्व बनावट बांधकाम कामगारांचे, संबंधित अधिकार्यांचे आणि दलालांची उच्चस्तरीय चौकशी करून तात्काळ कारवाई करण्याची मागणी आमदार राजेश विटेकर यांनी विधानसभा अध्यक्षांकडे केली.

## फक्त निवडणुकीत

वाढले आहेत.

रस्त्यांची दयनीय अवस्था:

चिखल, घाण, उघडी गटारे आणि साचलेलं सांडपाणी – हेच या भागाचं वास्तव आहे. पावसाळ्यात तर नागरिकांना घराबाहेर पाऊल टाकणंही धोक्याचं होतं. अपघात, घसरून पडणं, आणि सततच्या त्रासामुळे लोक त्रस्त झाले आहेत. या परिसरात डासांचा उपद्रव प्रचंड वाढला आहे. फवारणी, सफाई, औषध छिडकाव याबाबत प्रशासनाने कोणताही ठोस उपाय केलेला नाही. सामाजिक संस्था किंवा स्वयंसेवी गटांनीही याबाबत कोणतीच कृती केलेली नाही. प्रशासन झोपलं आहे, हे आम्ही समजून घेतलं. पण जे 'जनतेचे कैवारी' म्हणून मिरवतात, त्यांनी तरी आमची अवस्था पाहायला यावं, एवढी अपेक्षा काय चुकीची आहे का? असा थेट सवाल एका तरुणाने उपस्थित केला.केवळ फेसबुकवर पोस्ट टाकणं किंवा फोटो काढून झेंडे हाती घेणं म्हणजे समाजसेवा नाही, हे नागरिकांचे ठाम मत आहे.नागरिकांनी आता थेट इशारा दिला आहे की, जर प्रशासन आणि तथाकथित सामाजिक कार्यकर्ते आमच्या प्रश्नांकडे डोळसपणे पाहणार नसतील, तर आम्ही स्वतः रस्त्यावर उतरून संघर्ष करू.विकासाच्या घोषणांमधून वंचित राहिलेल्या या वस्त्यांमध्ये प्रशासन आणि समाजातील जबाबदार व्यक्ती दोघांचीही झोप अजूनही लागलेली आहे.

नागरिकांची मागणी:

आठवड्यातून किमान २-३ वेळा नियमित पाणीपुरवठा

पक्के रस्ते व गटारांची व्यवस्था

आरोग्य विभागाकडून नियमित फवारणी

सामाजिक कार्यकर्त्यांनी वस्तीत येऊन समस्या जाणून घ्याव्यात

## कुरेशी कॉन्फरन्स

संघटनेचे महाराष्ट्र कमिटीचे उपाध्यक्ष इमाम जाफर कुरेशी, कादर कुरेशी, साबीर अली कुरेशी, अजीज कुरेशी, माजी नगरसेवक अब्दुल हफीज फारुकी, माजी नगरसेवक खाजा बागवान, म. रफीक, शब्बीर कुरेशी, अलीम कुरेशी, बाबू कुरेशी, जावेद कुरेशी, आदींनी अभिनंदन केले.

## अल्पसंख्यांक

८ लाखा पेक्षा कमी असावे, महिला-मुलींसाठी ३० % जागा राखीव राहील, उंची व छाती नियमानुसार असावी, प्रशिक्षण ३ महिने निवासी राहील, प्रशिक्षणा दरम्यान उमेदरांना चहा, नाष्ट, जेवण, शैक्षणिक साहित्य, गणवेश किट, या सुविधा मोफत मिळणार आहेत, तज्ज्ञ शिक्षकांकडून लेखी, तोंडी तयारी व ग्राउंड प्रशिक्षण देण्यात येईल. आझाद हिंद संस्था कामखेडा ता. जि. बीड ही विश्वासु संस्था असुन अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी ही एक स्वर्णसंधी आहे सर्वांनी पोलीस शिपाई भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज करावे असे आवाहन लोकसेना संघटनेच्या वतीने ड. प्रा. इलियास इनामदार यांनी केले आहे.

## भ्रष्टाचार उघड करणाऱ्या

सततच्या मागणीनंतरही दोषींवर कोणतीही कारवाई झाली नाही. उलट त्यांच्यावरच खोट्या तक्रारी करून दडपशाहीचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि सत्याची बाजू जपण्यासाठी नागरिकांनी पाटील यांना त्वरित निलंबित करण्याची जोरदार मागणी केली आहे.दिनांक ३ जुलै २०२५ रोजी ही निवेदने पोलीस निरीक्षक, तहसीलदार, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे लेखी स्वरूपात देण्यात आली असून, यावेळी परिसरातील अनेक युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.नागरिकांनी इशारा दिला आहे की, जर संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित कार्यवाही झाली नाही, तर लोकशाही मार्गाने मोठं जनआंदोलन छेडण्यात येईल.

---

पान १ वरून

## जय हिंद, जय

आहेत. वेदांता फॉक्सकॅान सारखे मोठे प्रकल्प ज्यामुळे महाराष्ट्रात लाखो तरुणांना रोजगार मिळणार होता तो गुजरातला पाठवून दिला. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करत आहेत, तरुणांना रोजगार नाहीत, महिला सुरक्षित नाहीत, कुपोषण वाढले आहे पण सत्तेतील हे लाचार गुजरातची गुलामी करण्यात व्यस्त आहेत. अशा महाराष्ट्रद्रोह्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही, या शब्दांत सपकाळ यांनी हल्लाबोल केला.

दरम्यान, पुण्यातील गुजराती समुदायाकडून उभारण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स व कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाच मंचावर एकत्र आले होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या शेवटी 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात', अशी घोषणा दिली.

## काठ्या चालवणाऱ्यांनी

लावत आहेत. रझा अकादमीच्या मोर्चात पोलीस भगिनींवर हल्ला झाला तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा मोर्चा काढणारा एकमेव पक्ष होता. तेव्हा सगळे भाजपवाले शेपट्या घालून बसले होते. तेव्हा मनसे रझा अकादमीवाल्यांना भिडली होती. त्यामुळे काठ्या चालवणऱ्यांनी आम्हाला तलवार चालवायला शिकवू नये, असा टोला संदीप देशपांडे यांनी नितेश राणे आणि भाजप पक्षाला लगावला.

मीरारोडमध्ये अमराठी दुकानदाराला मनसेने मारहाण केल्याच्या मुद्द्यावरुन नितेश राणे यांनी जोरदार टीका केली होती. हिंदू धर्मियांना मारहाण करणाऱ्यांमध्ये दम असेल तर त्यांनी मोहम्मद अली रोड आणि नळबाजारात जाऊन आपली ताकद दाखवावी. या परिसरातही मराठी भाषा ऐकायला येत नाही. तिकडचे दाढीवाले आणि गोल टोपीवाले मराठी बोलतात का? मनसे तिकडे जाऊन अशी हिंमत दाखवू शकेल का? आमिर खान आणि जावेद अख्तर यांनाही मराठी येत नाही, मग तिकडे कोणी कसं बोलत नाही? आमचं सरकार हिंदुत्त्ववादी विचारांचं आहे. त्यामुळे आमच्या हिंदू बांधावांना मारणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल, असे नितेश राणे यांनी म्हटले होते.

बेपारी आहात बेपार करा,आमचे बाप बनण्याचा प्रयत्न करू नका.महाराष्ट्रात मराठीचा अपमान कराल तर कानाखालीच बसेल बाकी मेहता बिहता नी चड्डीत राहायचं. तूर्तास एवढंच, असे ट्विट संदीप देशपांडे यांनी शुक्रवारी केले होते. काल भाजपच्या लोकांनी दोन तीन बेपारी लोकांना घेऊन आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. त्यांना मला सांगायचे आहे की मराठीच्या विरोधात जाल तर कानाखाली खाल, असेही संदीप देशपांडे यांनी म्हटले.

मीरा-भाईंदरमधील भाजपचे मराठी कार्यकर्ते आणि पदाधिकारी नाराज झाले होते. याच नाराजीतून पेंकरपाडा येथील भाजपचे प्रभाग अध्यक्ष श्री. कुंदन सुरेश मानकर यांनी भाजपला रामराम ठोकून मनसेत प्रवेश केला.

## राज्यातील शाळांमधील

शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवित आहे. यु-डायस (णऊखडए) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात असल्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितले.

दरम्यान दादा भुसे यांनी केलेल्या घोषणेमुळे विधानपरिषदेत चांगलाच गदारोळ झाला. विरोधकांनी शाळांमध्ये शिपाई यांची भरती कायमस्वरूपी झाली पाहिजे अशी मागणी करत विरोधकांकडून हा जोरदार मुद्दा लावून धरला. तसेच शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे अशी मागणी केली. अनेक शाळामंध्ये जास्त मुली शाळांमध्ये शिक्षण घेत असतात . त्यामुळे त्याच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यामुळे कायमस्वरुपी भरती झाली पाहिजे.

## कोयता, लोखंडी

झाले. त्यांना तातडीने अंबाजोगाईच्या शासकीय रूग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. दरम्यान, या प्रकरणी केज पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच ७ आरोपींवर गुन्हा दाखल केला.पोलिसांकडून तपास सुरू असून, हल्लेखोर आरोपींविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य पसरले असून, चिखल आणि अस्वच्छतेमध्ये भाजीपाल्याची विक्री होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बाजारात पायवाटाही चिखलमय झाल्याने खरेदीदार आणि विक्रेत्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या घाणीत भाजीपाला खुलेपणाने विकले जात असल्याने रोगराई पसरण्याचा धोका वाढला आहे. मात्र, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची तीव्र तक्रार आहे.

## अजित पवारांच्या

आली. पोलिसांकडून अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगर पोलिसांकडून या प्रकरणाचा कसून तपास केला जात आहे.

अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली अन् एकच खळबळ उडाली. आमदार संग्राम जगताप यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर धमकीचा टेक्स्ट मेसेज आला होता. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मेसेजमध्ये संग्राम को दो दिन के अंदर खत्म करुंगा असा थेट जीवे मारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

हिंदुत्वासंदर्भातील भूमिका आणि वक्तव्यांमुळे आमदार संग्राम जगताप चर्चेत आले होते. या पार्श्वभूमीवर त्यांना थेट जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने राजकीय वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपासाला सुरूवात केला आहे. पोलिसांकडून सायबर पोलिसांची मदत घेतली जात आहे. या प्रकरणाचा तपास कोतवाली पोलिस ठाण्याच्या सहाय्यक फौजदार अमिना शेख करत आहेत. आमदार जगताप सध्या पावसाळी अधिवेशनासाठी मुंबई येथे आहेत.

## थाळी एकच पण

प्रकार उघडकीस आलाय. बीडमधील शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला असलेल्या उडपी हॉटेलमधला शिवभोजन थाळीच्या घोटाळ्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

शिवभोजन थाळी योजनेचे खोटे लाभार्थी दाखवण्यासाठी एकाच थाळीसमोर अनेक जणांचे फोटो काढले जात आहेत. त्या फोटोंच्या आधारे शिवभोजन थाळीसाठी मिळणारं अनुदान लाटण्याचा हा प्रकार आहे. हॉटेलचालकांनी अशा प्रकारे एका थाळीच्या नावाखाली ५० थाळ्यांचे अनुदान मिळवल्याचा आरोप आता होत आहे. व्हिडीओ व्हायरल होताच बीडमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र सरकारने २०२० मध्ये शिवभोजन थाळी योजना सुरू केलीय. गरजू, गरीब आणि मजूर वर्गाला परवडेल अशा दरात जेवण उपलब्ध करून देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. पात्र लाभार्थ्यांना फक्त १० रुपयांमध्ये ही शिवभोजन थाळी मिळते. या थाळीसाठीची उर्वरित रक्कम सरकारकडून अनुदान स्वरुपात हॉटेलचालकांना देण्यात येते. दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती, बेघर, मजूर, विद्यार्थी, रस्त्यावरील कामगार आणि गरजूंसाठी ही योजना सुरू करण्यात आली होती.बीडमधील शासकीय विश्रामगृहाजवळील उडपी हॉटेलने शिवभोजन थाळी योजनेतून अनुदान मिळवण्यासाठी एकाच थाळीसमोर लोकांना बसवून त्यांचे फोटो काढले जात असल्याचं समोर आलंय. आतापर्यंत अशा प्रकारे लाखो रुपयांचं अनुदान लाटलं गेल्याचा आरोप करण्यात येतोय. दरम्यान, योजनेतील त्रुटी आणि त्यात होणाऱ्या भ्रष्टाचारावर काय कारवाई होणार याकडे लक्ष लागून राहिलंय.

## अनधिकृत शाळा तपासणी

(मा.) प्रियाराणी पाटील यांनी दिले आहेत.

'प्राथमिक'कडे एक तक्रार

जिल्ह्यात एकही अनधिकृत शाळा नाही. प्राथमिक शिक्षण विभागाकडे अनधिकृत शाळेबाबत एक तक्रार आली असून, त्याची सत्यता पडताळणीसाठी संबंधितांकडून कागदपत्रे मागविली आहेत. शासन नियमानुसार परवानगी नसल्यास कारवाई केली जाईल.

भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्रा.) बीड

## बीड अर्बन मल्टिस्टेटमध्ये

भारतीय न्याय संहिताच् कलम ३३५, ३३६, ३३७, ३३८, ३४०, ३१ ३१९ अन्वये बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपामुळे बीडच्या वितीय वर्तुळा मोठी खळबळ उडाली असू पोलिसांच्या तपासाकडे सर्वांचे ल लागले आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलि निरीक्षक शीतलकुमार बल्लाम यांच्याकडून तपासाला सुरुवात करण्यात आली आहे'